

# गरुड झेप

www.janatabankpune.com

एप्रिल–मे २०१४ (जनता सहकारी बँक लि., पुणे द्वारा प्रकाशित गृहपत्रिका : केवळ खाजगी वितरणासाठी)

## अध्यक्षांचे लेखणीतून,



गुढीपाडव्याच्या शुभ मुहूर्तावर नवीन आर्थिक वर्षाला सुरूवात झाली आहे. नुकत्याच संपन्न झालेल्या आर्थिक वर्षात कामगिरी उत्कृष्ठ आहे. विशेष महत्त्वाची बाब म्हणजे आपल्या बँकेने दहा हजार कोटी रुपयाचा व्यवसाय विस्ताराचा टप्पा पार केलेला आहे.

ही उपलब्धी बँकेत कार्यरत सर्व कर्मचाऱ्यांच्या संघटित प्रयत्नांची फलश्रुती आहे. मी बँकेच्या सर्व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन करतो. नवीन आर्थिक वर्ष नवीन आव्हानांना सोबत घेऊन आले आहे. चालू वर्षी व्यवसायाच्या संख्यात्मक वाढीबरोबर गुणात्मक वाढीसाठी प्रयत्न करणे अधिक गरजेचे आहे. कासा ठेवीत प्रभावी वाढ करून नफा वृद्धी आपली प्राथमिकता आहे. शाखांची रचना, मांडणी, ग्राहक वर्ग यांचा अभ्यास करून शाखांनी मुख्य कार्यालयास कासा वृद्धीसाठी उपाय योजना सुचवाव्यात.

कर्जाचा विस्तार वेगाने होतो आहे. कर्जाचा दर्जा राखण्यासाठी अधिक प्रभावी नियंत्रण आवश्यक आहे. कौंटरवर सेवा देणाऱ्या कर्मचाऱ्यात नव्याने भरती केलेल्या कर्मचाऱ्यांचे प्रमाण वाढते आहे. ग्राहक, ग्राहक सेवा या विषयी उपयुक्त मार्गदर्शन सूचना शाखेत कार्यरत वरिष्ठ कर्मचाऱ्यांनी नवीन कर्मचाऱ्यांना द्याव्यात जेणेकरून आपल्या ग्राहक सेवेचा स्तर राखला जाईल.

के.वाय.सी., एएमएल, सीआरएआर या विषयी भारतीय रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन आपणास गांभीर्याने करणे गरजेचे आहे. त्यासाठी आपली व्यवस्था, कार्यपद्धती तसेच नियंत्रण देखील प्रभावी करावे लागेल. शाखांना केंद्रस्थानी घेऊन नियोजन केल्यास हे सहज शक्य होईल.

*आपल्या सर्वांना शुभेच्छा!*

## सहकार भारती प्रशिक्षण संस्थेच्या दशकपूर्ती समारंभात आपल्या बँकेचा विशेष गौरव करण्यात आला



सिक्कीमचे राज्यपाल मा. श्री. श्रीनिवास पाटील यांच्या हस्ते सन्मान स्विकारताना मा. श्री. खळदकरसाहेब. सोबत उपाध्यक्ष श्री. संजय लेले व सीईओ श्री. वसंत कुलकर्णी.

## व्यवसायाची गरूड झेप!
## रु.१०,००० कोटींचा व्यवसायाचा टप्पा पूर्ण!

आपल्या सर्वांच्या सहकार्याने, आपल्या बँकेने दि. ३१ मार्च २०१४ अखेर व्यवसायाचा एक महत्त्वाचा टप्पा पूर्ण केला आहे. ३१ मार्च २०१४ अखेर आपल्या

**बँकेच्या ठेवी रू. ६११९.८६ कोटी**

व

**बँकेची कर्जे रु. ४१३३.३४ कोटी**

झाली, ज्यामुळे एकूण व्यवसायाचा टप्पा रु. १०,००० कोटींचा पूर्ण झाला आहे.

**सर्व कर्मचारी, खातेदार, सभासद आणि संचालक मंडळाने केलेल्या या भरीव कामगिरीबद्दल सर्वांचे अभिनंदन!**

### २०१३–१४ : ची आपली कामगिरी

| | |
|---|---|
| ठेवी | ६११९.८६ कोटी |
| कर्ज | ४१३३.३४ कोटी |
| एकूण व्यवसाय | १०२५३.२० कोटी |
| भाग भांडवल | १२३.४३ कोटी |
| प्रतिसेवक व्यवसाय | १२.६४ कोटी |
| नफा | ५८.५२ कोटी |
| सेवक संख्या | ८११ |

# Bimonthly Review of Monetary Policy

Reserve Bank Governor Mr. Raghuram Rajan on 03.06.2014, while presenting second Bimonthly Review of Monetary Policy reduced SLR by 50 basis points for Banks from 23.00% to 22.50%. There is no change in other rates. All Banks in India will now have an uniform CRR of 4% and SLR 22.50%. The economists call it as a balancing act of the Governor. Reserve Bank of India the regulator of the Indian Economy and Supervisory head of the banks in India has the responsibility to make the funds available to vital components of the economy i.e. industries and agricultural sector to ensure development. Reserve Bank also has the responsibility to control inflation. Monitoring of inflation and development is done by Reserve Bank of India with the help of its monetary tools, CRR, SLR, Repo and Reverse Repo.

**Impact of change in CRR and SLR –**

Increase in CRR and SLR will result in reduction in lendable resources of banks, thus restricting supply of money in the market. Reduction in money supply will reduce demand and bring down the prices. Decrease in CRR and SLR will have the reverse effect.

**Impact of change in Repo and Reverse Repo –**

In simple terms, repo rate is the rate of interest on loans sanctioned by Reserve Bank of India to the Commercial Banks and Reverse Repo the rate of interest on deposits of Commercial Banks with Reserve Bank. Increase in repo rates will increase the interest on loans borrowed by Commercial Banks. This will result in increase of interest rates of loans by Commercial banks to public. Increase in interest rates will reduce the credit expansion of commercial banks and ultimately reducing supply of money in the market.

The present rate of inflation is as high as 8.30% and needs corrections to bring it down to less than 5%. Present G.D.P. is as low as 4.4% and also needs an immediate correction to lift it more than 5%.

There is change in the Government at the center. The new government is aggressive towards the growth and development. Mr. Rajan has presented his first Monetary review to the new government. The development activity is in full swing in the Country which needs strong financial support. Mr. Rajan released Rs.35,000 crores to banks making 0.50% correction in the S.L.R. There is gradual reduction in S.L.R. From 34% in 1994 to 22.50% in 2014. It may be looked as a step towards abolition of directed investments unlike international practices.

■■■

## श्री सचिन खेडेकर अभिनित 'आजचा दिवस माझा' चित्रपटाला सर्वोत्तम मराठी चित्रपटाचा राष्ट्रीय पुरस्कार जाहीर



आपल्या विलेपार्ले शाखेतील बचत ठेव खातेदार व सुप्रसिद्ध अभिनेते श्री. सचिन श्रीकांत खेडेकर यांनी अभिनय केलेला व मुख्य भूमिका असलेला मराठी चित्रपट ''आजचा दिवस माझा'' याला यंदाचा सर्वोत्तम मराठी चित्रपटाचा राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे, अभिनेते श्री. सचिन खेडेकरांचे आपल्या बँकेशी खूप जुने स्नेहबंध आहेत. आपणा सर्वांतर्फे त्यांचे हार्दिक अभिनंदन!

## अपूर्वा आफळेचे स्पृहणीय यश

आपल्या सहकारनगर, पुणे शाखेतील अधिकारी श्री. गजानन सदाशिव आफळे यांची कन्या कु. अपूर्वा गजानन आफळे हिने वैद्यकीय क्षेत्रात उत्तुंग कामगिरी केली आहे. तिने MBBS परीक्षेत ७३% गुण मिळवून B.J.Medical College मध्ये तृतीय क्रमांक मिळवला. बँकेतर्फे अपूर्वा व तिच्या पालकांचे हार्दिक अभिनंदन!!

## श्री. आशुतोष डुंबरे यांना शिवनेरी भूषण पुरस्कार व डॉ. मनोहर डोळे यांना डि. लीट पदवी प्रदान

आपल्या जुन्नर शाखेतील खातेदार श्री. आशुतोष कारभारी डुंबरे यांना या वर्षीचा शिवनेरी भूषण पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. ते शाखेचे २० वर्षापासून खातेदार आहेत. श्री. डुंबरे यांना मा. मुख्यमंत्री यांचे हस्ते दि. १९/२/१४ रोजी या पुरस्काराने गौरविण्यात आले. तसेच आणखी एक सन्माननीय खातेदार डॉ. मनोहर कृष्ण डोळे (रा. नारायणगांव) यांना पुणे येथील टि.म.विद्यापीठाने डि.लीट, पदवी जाहीर केली आहे. डॉ. डोळे बँकेचे सभासद आहेत व रा स्व. संघाचे जुन्नर तालुका माजी संघचालक आहेत व प्रसिद्ध नेत्रतज्ञ आहेत दि.१५/२/१४ रोजी पुणे येथेच टि.म.विद्यापीठात डॉ. डोळे यांना पदवी प्रदान कार्यक्रम संपन्न झाला आहे. वरिल दोन्ही ग्राहकांचा बँकेशी घनिष्ठ संबंध आहे. दोन्ही खातेदारांचे शाखेतर्फे अभिनंदन!

# कोल्हापूर शाखेच्या वतीने 'इच्छापत्र' विषयावर ज्येष्ठ नागरिक मेळावा संपन्न




कोल्हापूर शाखेने ज्येष्ठ नागरिक मेळावा आयोजित केला होता. यावेळी ॲड. शिराळकर यांनी ज्येष्ठ नागरिकांना इच्छा पत्र या विषयावर मार्गदर्शन केले. मेळाव्याची सुरूवात शाखा व्यवस्थापक श्री. प्रसन्न म्हाकवेकर यांच्या प्रास्ताविकाने झाली. बँकेचे उपमहाव्यवस्थापक श्री. श्रीराम आपटे यांनी बँकेच्या विविध योजनांची माहिती दिली. प्रमुख वक्ते ॲड. रवि शिराळकर यांचा बँकेचे संचालक श्री. सुनील मुतालिक यांचे हस्ते शाल व श्रीफळ देऊन सत्कार करणेत आला.

ॲड. रवी शिराळकर इच्छापत्राचे महत्त्व सांगताना म्हणाले, इच्छापत्र हे कोणत्याही नमुन्यात करता येते, त्याला दोन साक्षीदार आवश्यक असतात. आपली स्वमालकीची संपत्ती ही इच्छा पत्राद्वारे देता येते. इच्छापत्राला कोणतीही स्टॅम्प ड्युटी नाही तसेच नोंदणीची गरज नाही फक्त आपली मानसिक व शारीरिक स्थिती सुदृढ असणे आवश्यक आहे. ज्यावेळी आपण इच्छापत्र करू त्यादिवशी शक्यतो वैद्यकीय तपासणी करून तसा दाखला इच्छापत्राबरोबर जोडावा. इच्छापत्राची अंमलबजावणी करणेसाठी आपण व्यवस्थापक (EXECUTOR) नेमू शकतो असे कायद्यातील विविध पैलू आपल्या सोप्या व ओघवत्या भाषणात ॲड. रवि शिराळकर यांनी मांडले.

यानंतर ज्येष्ठ नागरिकांशी प्रश्नोत्तरे स्वरूपात चर्चा झाली. बँकेचे संचालक श्री. सुनील मुतालिक यांनी मनोगत व्यक्त केले आणि इच्छापत्रासंदर्भातील एक्झिक्युटर व ट्रस्टी हा विभाग जनता बँकेत गेली अनेक वर्षे स्वतंत्र व सक्षमपणे कार्यरत असलेची माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन श्री. उमेश उद्गावकर यांनी केले. श्री. विजय पुजारी यांचे पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली. या कार्यक्रमात ज्येष्ठ नागरिक संघाचे पदाधिकारी, सदस्य तसेच शाखेचे मान्यवर खातेदार, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वरिष्ठ गट राज्य मैदानी स्पर्धेत अस्मिता ढावरेला रौप्य पदक प्राप्त

आपल्या फर्ग्युसन रोड शाखेतील सेवक संभाजी ढावरे यांची कन्या अस्मिता ढावरे हिला; पुण्यात झालेल्या वरिष्ठ गट राज्य मैदानी स्पर्धेत महिलांच्या लांब उडीमध्ये रौप्यपदक प्राप्त झाले. अस्मिताचे बँकेतर्फे हार्दिक अभिनंदन!

## डॉ. अपर्णा देशमुख यांना समाजसेवेबद्दलचा 'मदर तेरेसा एक्सलंन्स ॲवॉर्ड' पुरस्कार प्रदान

आपल्या कर्वेनगर शाखेतील खातेदार डॉ. अपर्णा देशमुख यांना त्यांच्या समाजसेवेबद्दल बेंगळूरच्या People Foundation तर्फे 'मदर तेरेसा एक्सलंन्स ॲवॉर्ड' हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. डॉ. अपर्णा देशमुख या मूळच्या जळगावच्या! उच्च शिक्षणानिमित्त पुण्यात आल्या.

पुण्यात त्यांनी वृद्धांसाठी पोषक वातावरण असेल अशी तीन मजली इमारत भाडेतत्त्वावर घेतली व वृद्धाश्रम सुरू केला. गेल्या तीन वर्षात सुमारे तीनशे वृद्धांनी 'आभाळमाया' अनुभवली आहे, तर सध्या ३० जण इथं वास्तव्यास आहेत.

## चतुरंग प्रतिष्ठान पुरस्कृत सर्वोत्तम विद्यार्थी 'गोडबोले पुरस्कार'



पुरस्कारार्थी : शार्दूल संदीप गानू

आपल्या देवरूख शाखेतील सेवक श्री. संदीप सिताराम गानू यांचे सुपुत्र चि. शार्दूल संदीप गानू यास सर्वोत्तम विद्यार्थी म्हणून सन २०१३-१४ चा 'गोडबोले पुरस्कार' प्राप्त झाला आहे. हा पुरस्कार चतुरंग प्रतिष्ठान या संस्थेने पुरस्कृत केला आहे. कोकण शाळांतील गुणवान विद्यार्थ्यांचा शोध घेऊन त्यांचा सन्मान या पुरस्काराद्वारे करण्यात येतो.

शार्दूलला गायन-वाचन आणि कीर्तनाचा छंद आहे. शाळेच्या हॉकी व फुटबॉल सामन्यांमधूनही प्रथम येणाऱ्या शार्दूल समोर स्वा. वि.दा.सावरकर यांचा आदर्श आहे.

# कर्तव्य फाऊंडेशन व सदू शिंदे साखळी क्रिकेट स्पर्धांमध्ये आपल्या संघाची चमकदार कामगिरी!

पुणे : कर्तव्य फाऊंडेशन आयोजित आंतरबँक क्रिकेटस्पर्धेत आपल्या बँकेने युनियन बँक ऑफ इंडियावर सहज विजय मिळवला.

विजय राजपूत यांच्या भेदक गोलंदाजीच्या जोरावर जनता सहकारी बँकेने युनियन बँकेचा ८७ धावांनी पराभव करून बोनस गुणाची कमाई केली. जनता बँक संघाने प्रथम ४ बाद १८१ धावा केल्या. प्रसन्ना दास नाबाद ५३, राजीव शेखर ४४ व योगीराज ताटळे ३९, यांनी चांगली फलंदाजी केली. प्रत्युत्तरात, विजय राजपुतने १४ धावांत घेतलेल्या ४ बळींमुळे युनियन बँक संघ १९.१ षटकात केवळ ९४ धावांवर बाद झाला. राजीव शेखरने ३, तर तिमोती वाघमारेने २ गडी बाद केले.

त्याचप्रमाणे सदु शिंदे साखळी क्रिकेट स्पर्धेत गट उपविजेते पद पटकावून आपल्या संघाने उपांत्य फेरीपर्यंत मजल मारली. श्री विजय राजपूत यांना 'मॅन ऑफ दी मॅच' म्हणून घोषीत केले.

पुणे जिल्हा क्रिकेट संघटनेच्या (पीडीसीए) सदू शिंदे साखळी क्रिकेट स्पर्धेत आपल्या बँकेने एमकेके क्रिकेट क्लबचा ११९ धावांनी पराभव केला.

फर्ग्युसन महाविद्यायाच्या मैदानावर झालेल्या या सामन्यात आपण प्रथम फलंदाजी स्वीकारून आठ बाद २६९ अशी मोठी धावसंख्या उभारली. त्यात महत्त्वाचा वाटा आनंद कंदलगावकर (६६), आँचल लुटे (५७) व राजीव शेखर (५३) यांनी केलेल्या अर्धशतकाचा होता. त्यानंतर फिरकी गोलंदाज विजय राजपूतने २२ धावा देऊन चार गडी बाद करताना केलेल्या अचूक गोलंदाजीच्या जोरावर एमकेके संघाचा डाव १५० धावांत आटोपला. त्यांच्या सौरभ कुलकर्णीने केलेली अर्धशतकी खेळी अपुरी पडली. गेले ५ वर्षे या स्पर्धेत सतत हा गट विजय प्राप्त करत आहे. संपूर्ण संघाचे हार्दिक अभिनंदन!

## कुमार रेणुसे वीरश्री पुरस्काराने सन्मानित

आपल्या टिळकरोड शाखेतील खातेदार श्री. कुमार रेणुसे यांना ज्यो कीडस् क्लबतर्फे 'वीरश्री पुरस्कार' प्रदान करण्यात आला आहे.

श्री. रेणुसे हे धडाडीचे सामाजिक कार्यकर्ते आहेत. २००१ साली शाखेत एका खातेदाराची रोख रक्कम पळवून नेणाऱ्या चोरास त्यांनी शाखेतच पकडून दिले होते. व त्याबद्दल शाखेतर्फे, बँकेतर्फे त्यांचा सत्कार करण्यात आला होता.

श्री. रेणुसे यांचे बँकेतर्फे
हार्दिक अभिनंदन!

## डॉ. सविता देशपांडे यांना सुवर्णपदक



आपल्या कर्वे रोड शाखेच्या खातेदार व आबासाहेब गरवारे महाविद्यालयातील मानसशास्त्र विभागाच्या प्रमुख डॉ. सविता देशपांडे यांना ग्लोबल इकॉनॉमिक प्रोग्रेस अँड रिसर्च इन्स्टिट्यूटतर्फे (चेन्नई) सुवर्ण पदक देऊन गौरविण्यात आले. हा कार्यक्रम चेन्नई येथे झाला. मानसशास्त्रातील प्रदीर्घ अध्ययन आणि संशोधन निमित्त हे गोल्ड मेडल त्यांना देण्यात आले आहे.

बँकेतर्फे त्यांचे हार्दिक अभिनंदन!
त्यांच्या पुढील कार्यास शुभेच्छा!

## आमुचा राम राम घ्यावा....

### माहे मार्च ते मे २०१४ अखेर निवृत्त सेवकांची यादी

| अ.क्र. | नाव | शाखा/विभाग | हुद्दा |
|---|---|---|---|
| १ | श्री. ज्ञानदेव हरीभाऊ बांगर | विलेपार्ले | कनिष्ठ अधिकारी |
| २ | श्री. नंदकिशोर प्रभाकर नागपुरे | टिळक रोड | लेखनिक |
| ३ | श्री. लक्ष्मण त्रिंबक कुलकर्णी | सीरायसीडी | लेखनिक |
| ४ | श्री. राजेंद्र शांताराम बांबुळकर | कोल्हापूर | लेखनिक |
| ५ | श्री. जयराम सखाराम दिघे | सीआयसीडी | लेखनिक |
| ६. | श्री. जयवंत बाबुराव लोणारी | तळेगाव दाभाडे | लेखनिक |
| ७. | श्री. बापू शंकर जगदाळे | मार्केटयार्ड | लेखनिक |
| ८. | श्री. शांताराम किसन गाजरे | विलेपार्ले | लेखनिक |
| ९. | श्री. बाळासाहेब आत्माराम कदम | सेक्रेटरीयल | शिपाई |
| १०. | श्री. भरत महिपती मांडेकर | टिळक रोड | शिपाई |
| ११. | श्री. प्रकाश निवृत्ती मारणे | कर्वेनगर | शिपाई |

### भावपूर्ण श्रद्धांजली

आपल्या फर्ग्युसन रोड शाखेतील लेखनिक आनंद केशव चिलवेरी यांचे दि. २५ मे २०१४ रोजी दु:खद निधन झाले आहे. मृतात्म्यास सद्गती मिळो ही प्रार्थना!

# उद्घाटन : बाजीराव रोड शाखेचे नूतनीकरण, जनता बँक रूपे डेबीट कार्ड व नवीन वेबसाईट पेजचे....

गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर बाजीराव रोड शाखेच्या नूतनीकरणाचे उद्घाटन प्रख्यात वकील ॲड. प्रतापराव परदेशी, बँकेचे अध्यक्ष मा.श्री. अरविंदराव खळदकर यांचे हस्ते करण्यात आले. या प्रसंगी बँकेचे संचालक मा.जगदीशजी कदम, मा. बिरू खोमणे, मा. सुनील मुतालिक, मा. किशोरभाई शहा, मा. लक्ष्मण पवार, मा. विजयराव भावे उपस्थित होते.

उद्घाटन समयी बँक लवकरच सहा आकडी व्यवसाय गाठेल असा विश्वास ॲड. प्रतापराव परदेशी यांनी व्यक्त केला. बँकेचे दूरदृष्टी असणारे नेतृत्व, प्रामाणिक सेवक आणि सुस्मित सेवा, अत्याधुनिक तंत्रज्ञान याच्या जोरावरच बँकेने हे उदिष्ट साध्य केल्याचे त्यांनी सांगितले. बँकेला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देताना त्यांनी रु. १०००० कोटींचे व्यवसायाचे उद्दिष्ट तसेच बाजीराव रोड शाखेचे रु. १००० कोटींचे व्यवसायाचे उद्दिष्ट प्राप्त केल्याबद्दल त्यांनी रु.१०००००/- ची नवीन ठेव सुपूर्द केली.

अध्यक्ष मा. श्री. अरविंदराव खळदकर यांचे हस्ते जनता बँक रूपे डेबिट कार्डचे व बँकेच्या नवीन वेबसाईट पेजचे उद्घाटन करण्यात आले. यासाठी कष्ट घेणाऱ्या डाटा सेंटरच्या कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले आणि



**छायाचित्रात अनुक्रमे डावीकडून बँकेचे संचालक मा.श्री.जगदीश कदम, बँकेचे अध्यक्ष मा.श्री. अरविंदराव खळदकर, बाजीराव रोड शाखेचे शाखाव्यवस्थापक श्री. जगदीश कश्यप, उद्घाटक मा.श्री.ॲड.प्रताप परदेशी, बँकेचे प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी मा.श्री.वसंतराव कुलकर्णी.**

बँकेतील सेवक, खातेदार सभासद व हितचिंतक यांच्यामुळे बँक व्यवसायाचे एक-एक शिखर सर करीत असल्याची भावना व्यक्त केली. तसेच बँकेची बाजीराव रोड शाखेची इमारत सारसबाग ते शनिवारवाडा या टापूतील सर्वात आकर्षक वास्तू असेल, असा विश्वास व्यक्त केला.

उद्घाटन प्रसंगी बँकेचे सन्माननीय खातेदार, सभासद, हितचिंतक व सेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक बँकेचे प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी मा.श्री. वसंतराव कुलकर्णी यांनी केले तसेच सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. पराग ठाकूर व आभार प्रदर्शन बाजीराव रोड शाखेचे शाखाव्यवस्थापक श्री. जगदीश कश्यप यांनी केले.

# बाजीराव रोड, पुणे शाखा : जय हो!

बाजीराव रोड शाखेने बँकेच्या रु. १०,००० कोटी व्यवसायाच्या उद्दिष्टाबरोबरच शाखेचे रु. १००० कोटी व्यवसाय उद्दिष्ट प्राप्त करीत असताना बँकेने दिलेल्या उद्दिष्टांची खालीलप्रमाणे आकडेवारी साध्य करून बँकेत एक आदर्श निर्माण केला आहे.

| | |
|---|---|
| **ठेवी** | **५७६.०४ कोटी** |
| **कर्ज** | **४७१.२८ कोटी** |
| **एकूण व्यवसाय** | **१०४७.३२ कोटी** |
| **नफा** | **१४.९३ कोटी** |

या व्यवसायवृद्धीत शाखेतील सर्व अधिकारी, लेखनिक व शिपाई बंधूंनी मोलाचे योगदान दिले आहे. विशेषत: ठेवीचे उद्दिष्ट प्राप्त करणेसाठी पुणे शहर, अहमदनगर, सोलापूर, पंढरपूर, म्हसवड आदी ठिकाणाहून अथक परिश्रमाद्वारे यश प्राप्त केले आहे.

शाखेने भागभांडवलाचे उद्दिष्ट कर्ज, लॉकर व उत्कृष्ट ग्राहकसेवा यांचे सहाय्याने प्राप्त केले आहे. नजीकचे काळात शाखा डेली कलेक्शन योजनेद्वारे जास्तीत जास्त ग्राहकांना आकर्षित करून समाजातील सर्व स्तरापर्यंत पोहोचून खऱ्या अर्थाने छोट्या लोकांची मोठी बँक ही बिरुदावली मिरविण्याचा प्रयत्न सुरू केला आहे.

बाजीराव रोड शाखेच्या नुतनीकरणाचे निमित्ताने श्री सत्यनारायण महापूजेचे आयोजन सोमवार, दि. ७ एप्रिल २०१४ रोजी केले होते. सदर कार्यक्रमास समाजातील विविध स्तरातील मान्यवर खातेदार, हितचिंतक असे सुमारे २५०० लोकांनी शाखेस भेट देऊन शुभेच्छा दिल्या. त्यात प्रामुख्याने चितळे बंधू मिठाईवाले यांचे श्री. श्रीकृष्णकाका चितळे, भा.ज.पा.चे शहराध्यक्ष व खासदार श्री. अनिलराव शिरोळे, नगरसेवक श्री. अशोक येनपुरे, श्री. हेमंत रासने, श्री. दिलीप काळोखे, डी. ई.एस सोसायटीच्या नियामक मंडळ व परिषदेचे उपाध्यक्ष श्री. विकासराव काकतकर, सरस्वती मंदिर संस्थेचे श्री. शंतनू चिंथडे, नामवंत आर्थो पेडीक सर्जन डॉ. मिलिंद मोडक व सौ. डॉ. कालिंदी मोडक अशा अनेकांचा समावेश होता. बँकेचे अध्यक्ष मा.श्री. अरविंदराव खळदकर व सर्व संचालक सदर कार्यक्रमास उपस्थित राहून मान्यवरांशी संवाद साधला.

# Time Management

Every individual has the same amount of time to his disposal i.e. twenty four hours. The beggar begging on the street or some top official have the same amount of time. Every individual needs time for his personal use. Some have plenty of time and some starve for it. Time cannot be sold, purchased, rented, hired, stored, replaced. Time is absolutely perishable. Time cannot waste itself, it needs your help. Time is democratic uniform twenty four hours to every body irrespective of caste, creed, gender. Time is generous-you spend twenty four hours today. You will get another twenty four hours tomorrow. Time is most precious and purely a personal thing.

**Everybody must avoid following**
**Time Stealers-**

(i) Habits - Sleep, getting up late, day dreaming, complaining, comparison
(ii) Technology - television, Radio, Mobile Phones, Social Media sites on internet
(iii) Lack of self confidence
(iv) Inability to say 'no'
(v) Confused responsibility and authority
(vi) Procrastination
(vii) Inadequate, inaccurate information
(viii) Lack of communication
(ix) Crisis Management
(x) Lack of objective
(xi) Ineffective delegation
(xii)Telephonic interruption
(xiii) Drop in visitors
(xiv) Personal disorganization

**Strategies for Time Management**

(1) Set your goals and a plan of action to achieve them .
(2) Be objective in evaluation of situation and the people
(3) Meet the dead lines
(4) Practice emotional intelligence
(5) List your priorities-prepare time log and execute them
(6) Avoid time stealers
(7) Be organized - Be alert, Watchful, knowledgeable
(8) Arrange your desk, files neatly
(9) Handle each paper only once.
(10) Be self confident - master tough situations, develop will power

**Hierarchy of time**




**Selective delay**

- 38% for problems today
- 40% for problems coming weekend
- 15% for problems after a week to a month
- 5% for problems after one to six months
- 2% for problems after six months

**Leisure and recreation**

- Refresh your mind
- Reduce stress
- Strengthen your body

**Reading**

- Do not reread
- Do not vocalize
- Do not move your head
- Increase reading span

**Writing**

(1) Be précised
(2) Use contractions
(3) Plan beginning, middle, end
(4) Use short terms, abbreviations

**At Home -**

(1) Use mails
(2) Avoid peak hours
(3) Organize your finances
(4) Lessen your worries
(5) Keep your budget within control
(6) Do not be glued to TV
(7) Preserve a set of spare keys
(8) Get the family together in the morning
(9) Bunch your appointments
(10) Anticipate child care crisis
(11) Have a master list
(11) Teach your family systems and use them
(12) Shop once a week
(13) Keep repairs under control
(14) Shop only twice a year for clothes
(15) Entertain simply and stay calm
(16) Accept selective invitations

# आयुर्वेद प्रत्येकाकरिता!

## आरोग्यावर बोलू काही - भाग १

श्री. वैद्य विनायक खडीवाले

टॉनिकला शक्तिवर्धक हा अगदी योग्य असा मराठी प्रतिशब्द नव्हे; पण सर्वसाधारणपणे प्रत्येकाच्या मनात तोच भाव असतो. म्हणूनच, 'डॉक्टर, अशक्तपणा वाटतो, जरा टॉनिक लिहून द्या' असं माणूस चटकन् बोलून जातो. औषधोपचारांच्या निरनिराळ्या प्रकारात आणि शास्त्रांत टॉनिक्सचा उपयोग सांगितलेला आहे. परिस्थितीप्रमाणे डॉक्टर, वैद्य, हकिम त्यांचा उपयोग करतात.

तारुण्य आणि आयुर्वेद यांच्या संदर्भात टॉनिक्सना विशेष महत्त्व आहे. तारुण्य म्हणजे कार्यक्षमता, उत्साह, शारीरिक आणि मानसिकही, जेव्हां त्यांनी उणीव भासायला लागते, त्यावेळी इतर उपचाराप्रमाणे शक्तिवर्धकांचीही उपाययोजना करावी लागते.

निसर्गक्रमाने वयाच्या सत्तरीनंतर शरीराची झीज होत असेल, तरी ती स्वाभाविक होय. आयुर्वेदशास्त्र सत्तर वर्षापर्यंत तारुण्यमर्यादा मानते. तोपर्यंत सामान्यपणे शरीरातील सर्व धातू, स्त्रोतस्, अवयव धडधाकटपणे काम करावयास हवेत.

शरीरातील अवयवांचे नियंत्रण, पोषण, रक्षण करणारी तीन मूलतत्त्वे आयुर्वेद मानतो. वात, पित्त व कफ हे तीन दोष समस्थितीत असले की, शरीराचा गाडा नीट चालतो. या दोघांचे संतुलन बिघडले की दृष्य, रस, रक्त, मांस, मेद, अस्थी, मज्जा व शुक्र हे सात धातू व पुरीष, मूत्र व स्वेद हे तीन मल बिघडतात. या धातू व मलांचे शरीरात निर्मिती व वहन करणारी स्थाने- स्त्रोतसे आहेत, ती पण बिघडतात. म्हणून शरीरास, कोणत्याही भागाकरिता, जेव्हा टॉनिकची गरज लागते त्यावेळेस, या स्त्रोतसांना तोल सांभाळण्याची काळजी कशी घ्यावी, त्यांचे करिता काय करावे हे आयुर्वेद सांगतो. आयुर्वेदाच्या निरनिराळ्या ग्रंथात शक्तिवर्धकाच्या बल्य, रसायन, जीवनीय, बृहणीय, वृष्य, वाजीकर, शुक्रवर्धक, स्निग्ध, स्नेहोपग, स्तन्य, स्तन्यवृद्धीकर, शुक्रप्रवर्तक, सद्य: शुक्रवर्धक, रक्तवर्धक, अस्थिवर्धक, अस्थिसंधानकर, मेधाकर, ओजवर्धक अशा विविध संज्ञा सांगितल्या आहेत. आयुर्वेदातील दोषधातूमल विज्ञान व द्रव्यगुणशास्त्र विज्ञान व पोटशाखांच्या आधारे आधुनिक संदर्भात वेगवेगळ्या अवयवांच्या स्त्रोतसांच्याकरिता 'आयुर्वेदीक टॉनिक' काय देता येईल, याचा विचार थोडक्यात मांडीत आहोत.

१. प्राणवह स्त्रोतस: प्राणतत्त्व बळकटपणे काम करावे म्हणून शृंगभस्म, सुवर्णमाक्षिकादि वटी, चौसष्ट पिंपळी चूर्ण, अडूळसा, लाक्षा चूर्ण, लाक्षादि गुग्गुळ, आरोग्यवर्धिनी, वासापाक लाक्षादि घृत यांचा उपयोग होतो.

२. उदकवह स्त्रोतस: चांगली तहान लागावी म्हणून द्राक्षासव व द्राक्षारिष्टाचा उपयोग होतो. प्यालेल्या पाण्याचा शरीराला उपयोग व्हावा, पाण्याचे अजीर्ण होऊ नये म्हणून सूंठ, नागरमोथा यांनी सिद्ध केलेले जल वापरावे. शुद्ध चांगल्या पाण्याचे समाधान काही वेगळेच आहे. 'उदकं आश्वासकराणां श्रेष्ठम्!'

३. अन्नवह स्त्रोतस: अन्न पहिल्यापासून ते पूर्ण पचन होईपर्यंत उत्तम कार्य व्हावे म्हणून आमलक्यादि चूर्ण, ओवा, बडीक्षेप, द्राक्षासव द्राक्षिरिष्ट, आले लसून यांचा उपयोग होतो. आलेपाक अन्नवह स्त्रोतसाकरिता उत्तम टॉनिक होय.

४. असवह स्त्रोतस : जून कोहळ्या रस, ऊसाचा रस, गाईचे दूध, शतावरी, ज्येष्ठमध, भुईकोहळा, गोखरू, ताजे आवळे, फळे, नारळाचे पाणी, साखर, गुळवेल सत्व, कुष्मांडपाक यांचा उपयोग रसावह स्त्रोतसाच्या सम्यक् पोषणाकरिता होतो.

५. अक्तवह स्त्रोतस : पिंपळ, लाख, शृंगभस्म, सुवर्ण, रौप्य, ताम्र, लोभस्म, केशर, पिंपळी, शिलाजित, चंद्रप्रभा, आरोग्यवर्धिनी, बृहत्वातचिंतामणी, चंद्रकला, सुवर्णमाक्षिकादीवटी, फलत्रिकादी काढा, कुमारी आसव, कोरपडीचा गर, पालेभाज्या, कडधान्यांचे कढण यांचा रक्तवह स्त्रोतसाच्या पोषणाकरिता उपयोग होतो. याशिवाय पुनर्नवा मंडूर बालके व वृद्धांकरिता, कासीस भस्म स्त्रियांच्या पांडुतेकरिता विशेष उपयुक्त आहे.

६. मांसावह स्त्रोतस : शतावरी, आस्कंद, भुईकोहळा, शतावरी कल्प, च्यवनप्राश, कडधान्ये, गहू, म्हशीचे दूध, तूप, साखरेचे पदार्थ, अमृतप्राश घृत, शातवी घृत यांचा उपयोग मांसावह स्त्रोतसांच्या पोषणाकरिता होतो. शतावरी सिद्ध तेल किंवा महानारायण तेलाने मसाजही उपयुक्त आहे.

७. मेदोवह स्त्रोतस : आस्कंध, भुईकोहळा, चिकणामूळ, कडधान्ये, गहू, म्हशीचे दूध, तूप, साखर, दही, अमृतप्राश घृत यांचा उपयोग मेदोवह स्त्रोतसांच्या पोषणाकरिता होतो.

८. अस्थिवह स्त्रोतस : शृंगभस्म, सांबरशिंग, लाक्षादि गुग्गुळ, लाक्षादि घृत, महात्तिक घृत, माका, शतावरी, पिंपळलाख, अर्जुनसाल, चिकणा, आस्कंध, रसायन चूर्ण, पालेभाज्या, गहू उडीद यांचा उपयोग अस्थिवह स्त्रोतसांच्या पोषणाकरिता होतो.

९. मज्जावह स्त्रोतस : ब्राह्मी, शंखपुष्पी, जटामासी, बदाम, आवळा, शतावरी, अक्रोड, सारस्वतारिष्ट, ब्राह्मीवटी, तूप, सुवर्ण, च्यवनप्राश, ब्राह्मीप्राश, पिंपळ साल यांचा उपयोग मज्जावह स्थोतसांच्या पोषणाकरिता होतो.

१०. शुक्रवह स्त्रोतस : आस्कंध, चिकण, अवचबी, तालीमखाना, भुईकोहळा, गोखरू, चोपचिनी, हरणखुरी, दूध, तूप, अंडी, बदाम, रसायन चूर्ण, च्यवनप्राश , कुष्मांडपाक, मधुमालिनी वसंत, चंद्रप्रभा, लक्ष्मीविलास, यांचा उपयोग शुक्रवह स्त्रोतसांच्या पोषणाकरिता होतो.

११. मूत्रवह स्त्रोतस : गोखरू, शतावरी, आघाडा, आवळीकाठी, जिरे, गोक्षुरादि गुग्गुळ, रसायन चूर्ण, शिलाजित, चंद्रप्रभा, शतावरी घृत यांचा उपयोग मूत्रवह स्त्रोतसांच्या पोषणाकरिता होतो.

आयुर्वेदाचे उपचार आज हजारो वर्षे असंख्य वैद्य यशस्वीपणे करत आले आहेत. कृश, मतिमंद, क्षीण, आत्मविश्वास गमावलेले, शुक्राणू कमी असलेले, जीर्ण ज्वरातून उठलेले, पोयाच्या विकाराचे रोगी, क्षयी व्यक्ती अशा विविध विकारांत वैद्य लोक कळत नकळत 'टॉनिक्स' देत आले आहेत.

अशी औषधे कोणकोणत्या रोगांत, अवस्थेत शरीराच्या स्त्रोतसात, कुठे टॉनिक म्हणून उपयोगी पडतात. याची थोडक्यात माहिती आम्ही देत आहोत. यापेक्षा शेकडो वैद्यांचे अनुभवात अनेक विकारत आणखी टॉनिक्स असून शकतील. या दृष्टीने विचाराला चालना देण्याकरिता आयुर्वेदीक उपचारांची ही फक्त एक झलक आहे.

१. केस : वडाच्या पारंब्याप्रकाणे बळकट व मुंग्यांच्या वर्णाप्रमाणे काळ्याभोर केसांकरिता वडाच्या पारंब्या, कोरफळ, आवळ्यांचा रस, माका, नागरमोथा ही पाच औषधे तेल तयार करण्याकरिता उपयोगी आहेत. पोटात घेण्यासाठी आरोग्यवर्धिनी सकाळी व सायंकाळी तीन गोळ्या व रसायन चूर्ण सकाळी १ चमचा तीन महिनेपर्यंत घ्यावे.

**क्रमश:**

**वाचकांस नम्र आवाहन**

गरूड झेप मध्ये प्रकाशित करण्यासाठी शाखा, कर्मचारी, ग्राहक, बँक, बँकिग यांचे विषयी उपयुक्त तसेच महत्वाची बातमी, माहिती, विशेष उपलब्धी गौरव पुरस्कार छायाचित्रासह ए फोर साईझच्या पांढऱ्या कागदावर सुवाच्य अक्षरात लिहून बंद पाकिटात खालील पत्त्यावर पाठवावा. श्री.जयंत लोकरे, मनुष्यबळ विकास विभाग, मुख्य कार्यालय, पुणे.

## श्री. दिलीप चंदवाणी 'शिल्पकार गौरव २०१३' पुरस्काराने सन्मानित



बांधकाम क्षेत्रातील विशेष योगदानाबद्दल आपल्या कोल्हापूर शाखेचे सन्माननीय सभासद खातेदार श्री. दिलीप चंदवाणी (मे. चंदवाणी सिरॅमिक्सचे भागीदार) यांना कोल्हापूर शहर परिसरातील 'शिल्पकार गौरव पुरस्कार' समितीच्या वतीने 'शिल्पकार गौरव' पुरस्कार प्रदान करण्यात आला. हार्दिक अभिनंदन!

## जागतिक बुद्धिबळ स्पर्धेसाठी आंतरराष्ट्रीय पंच म्हणून राजेंद्र शिदोरे यांची निवड

आपल्या सिंहगडरोड शाखेतील सेवक श्री. राजेंद्र शिदोरे यांची आंतरराष्ट्रीय पंच म्हणून जागतिक बुद्धीबळ स्पर्धेमध्ये निवड झालेली आहे. अखिल भारतीय बुद्धीबळ संघटनेने १२ ते २० जुलै २०१४ दरम्यान पुण्यात होणाऱ्या राष्ट्रीय कुमार बुद्धीबळ स्पर्धा त्याचप्रमाणे मुंबई येथे होणाऱ्या जागतिक कुमार बुद्धीबळ स्पर्धेसाठी पंच म्हणून श्री. राजेंद्र शिदोरे यांची नियुक्ती करण्यात आल्याचे कळविले आहे.

बँकेतर्फे श्री. शिदोरे यांचे हार्दिक अभिनंदन!

## इंदापूर शाखेतर्फे श्रीमती पार्वतीबाई ननवरे हायस्कूलला पिण्याच्या पाण्याची टाकी भेट

'ज्ञानगंगा बालविकास मंडळ' या संस्थेचे; श्रीमती पार्वतीबाई ननवरे हायस्कूल सोलापूर जिल्ह्यात मौजे खंडाळी, ता. माळशिरस येथे आहे. विद्यार्थीसंख्या ५०० आहे. शाळेजवळ विंधन विहीर असूनही पाण्याचा साठा करण्याची व्यवस्था नसल्याने विद्यार्थ्यांचे पिण्याच्या पाण्याचे हाल होत होते. याबाबत शाळेचे शिक्षक श्री. सपकाळे सर यांनी आपल्या इंदापूर शाखेचे शाखाप्रमुख श्री. सीताकांत मेंडजोगी यांच्याशी संपर्क साधला. अपुऱ्या पाणीव्यवस्थेमुळे विद्यार्थ्यांचे पिण्याच्या पाण्याबाबत हाल होत असल्याने बँकेकडून ही व्यवस्था करण्याची विनंती केली.

**बँकेचे सामाजिक उत्तरदायित्व :** २६/२/२०१४ रोजी छोट्याशा कार्यक्रमात पिण्याच्या पाण्याची टाकी (२ हजार लिटर) शाळेला भेट देण्यात आली. यावेळी श्री. मेंडजोगी यांच्याबरोबर शाखा कर्मचारी श्री. सचिन आंबेकर उपस्थित होते.शाळेचे सर्व शिक्षक, अध्यक्ष श्री. सुभाष गांधी, मुख्याध्यापक श्री. वाघमोडे, प्राध्यापक श्री. सपकाळे व दहावीचे १०० विद्यार्थी उपस्थित होते.

सदर टाकी संस्थेतर्फे श्री. गांधी व श्री. वाघमोडे यांनी स्वीकारली व बँकेचे विशेष आभार मानले.

## कोल्हापूर शाखेचे खातेदार डीएन विंड उद्योगास ISO मानांकने प्रदान



**कोल्हापूर : गमेशा विंडमिल पॉवर कंपनीचे प्रॉडक्शन हेड राजकुमार यांच्या हस्ते पुरस्कार स्वीकारताना दिनेश बुधले, नितीन वाडीकर, अधिकारी व कर्मचारी, कोल्हापूर शाखेचे सन्माननीय सभासद खातेदार.**

औद्योगिक क्षेत्रात विंडमिलसाठी लागणाऱ्या शक्तिशाली टॉवर्सचे उत्पादन करणाऱ्या व आपल्या कोल्हापूर शाखेचे सन्माननीय सभासद खातेदार मे. डीएन विंड सिस्टीम इंडिया प्रायव्हेट लिमिटेडला दोन यशस्वी मानांकने नुकतीच प्रदान करण्यात आली. टीव्हीयू साऊथ एशिया या जर्मन कंपनी पुरस्कृत संस्थेकडून ओएचएसएस १८००१-२००७ व आयएसओ १४००१-२००४ अशी मानांकने देण्यात आली. चेन्नई येथील गमेशा विंडमधील पॉवर उत्पादक कंपनीचे प्रॉडक्शन हेड राजकुमार यांच्या हस्ते ही मानांकने प्रदान करण्यात आली. हेवी फॅब्रिकेशन उत्पादन क्षेत्रात पुरस्कार मिळवणारी डीएन विंड ही एकमेव कंपनी ठरली आहे. ओएचएसएस १८००१-२००७ हे मानांकन मनुष्य सुरक्षिततेसाठी, तर आयएसओ १४००१-२००४ हे मानांकन पर्यावरणीय दृष्टीने महत्त्वाचे मानले जाते. सर्व निकष तपासूनच डीएन विंडला या मानांकनाने सन्मानित करण्यात आले आहे. ही मानांकने मिळवण्यामध्ये अनिकेत पाचोरे, सुनील जोशी यांनी ऑडिट केले. नेमी कन्सल्टंटचे सहकार्य मिळाले. पुरस्कार वितरण सोहळ्याला कंपनीचे संचालक दिनेश बुधले, नितीन वाडीकर, अभिजीत लकुंद्रे, शाहब कित्तूर आदी उपस्थित होते.

### मी रांगेतच होतो



आमच्या एका शाखेत हयातीचे दाखले देण्यासाठी पेंशनर रांगेत उभे होते. एक जण रांगेतून थोडेसे बाहेर उभे राहिले होते. आमच्या सह्या घेणाऱ्या अधिकाऱ्याला ते माहित नव्हते. ते पटकन त्या पेंशनरला म्हणाले की, अहो तुम्ही रांगेत घुसू नका. याचा त्यांना राग आला. त्यांचा रक्तदाब यामुळे एकदम वाढला व ते तेथेच बेशुद्ध झाले. बँकेतील सर्वजण घाबरले. जवळच्या डॉक्टरांना बोलावले. नंतर ते शुद्धीवर आले. त्यांना कॉफी दिली. संबंधित अधिकाऱ्याने त्यांना विचारले की तुम्हाला अचानक काय झाले? ते म्हणाले मी रांगेतच होतो जरासा बाजूला सरकलो होतो. मी रांगेत असताना सुद्धा सर्वांसमोर मी रांगेत घुसतोय असे तुम्ही का म्हणालात याचा मला राग आला.

गरूड झेप

गरूड झेप ही गृहपत्रिका केवळ खाजगी वितरणासाठी प्रकाशित केली आहे. यातील मते व्यक्तिगत असून बँक त्याचेशी सहमत असेलच असे नाही.
गृहपत्रिकेसाठी लिखाण, सूचना इ. साठी मनुष्यबळ विकास विभाग, मुख्य कचेरी येथे संपर्क करावा.
दूरध्वनी : ०२०-२४४५०५४०, मो. नं. ९९७०८००३४८. संपादकीय समन्वय : भालचंद्र कुलकर्णी, जनसंपर्क अधिकारी (मोबा. : ९८२२८८२५०९)